कार्यालय पोलीस उप अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद

**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक:-28/01/2021**

**दत्तात्रय माणिक तिगाडे, वय ३८ वर्ष, कोतवाल, सज्जा बेंबळी सध्या कामकाज अभिलेख कक्ष, तहसिल कार्यालय, उस्मानाबाद यांनी 100/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबादच्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | दत्तात्रय माणिक तिगाडे, वय ३८ वर्ष, कोतवाल, सज्जा बेंबळी सध्या कामकाज अभिलेख कक्ष, तहसिल कार्यालय, उस्मानाबाद |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.28.01.2021 रोजी अभिलेख कक्ष, तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथे |
| तपासी अधिकारी | श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक ला.प्र.विभाग, उस्मानाबाद |
| लाचेची रक्कम मागणी | 100/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे आजोबांचे नावे वरुडा शिवारातील शेत गट नं.५०१, सर्व्हे नं. १०१,१०२ मध्ये असलेल्या ५ हेक्टर २ आर जमीनीची १९९२ ची फेरची नक्कल अभिलेख कक्षामधुन शोधुन देण्यासाठी |

यातील तक्रारदार हे शेतकरी असुन तक्रारदार यांचे आजोबाचे नावे वरुडा शिवारातील शेत गट नं.५०१, सर्व्हे नं. १०१,१०२ मध्ये असलेली ५ हेक्टर २ आर जमीन तक्रारदार व त्यांचे भाऊ यांचे नावावर होण्यासाठी त्यांनी कोर्टात दावा दाखल केलेला आहे. सदर प्रकरणामध्ये त्यांना फेर क्रमांक २५३ दि.२०.०६.१९९२ रोजीचे फेरफार नक्कलेची आवश्यकता असल्याने ते १९९२ च्या फेरची नक्कल घेण्यासाठी तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथील अभिलेख कक्षामध्ये गेले असता तेथील तिगाडे यांनी तक्रारदार यांचेकडे २००/- रु लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.27.01.2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथील पोलीस निरीक्षक श्री.गौरीशंकर पाबळे यांचेकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.28.01.2021 रोजी तिगाडे यांची तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथील अभिलेख कक्षामध्ये लाच मागणी पडताळणी केली असता त्यांनी तक्रारदार यांचेकडे नमुद कामासाठी 100/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे आज दि.28.01.2021 रोजी सापळा आयोजीत केला असता तहसिल कार्यालय, उस्मानाबाद येथील अभिलेख कक्षामध्ये तिगाडे यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेच्या मागणीप्रमाणे 100/- रुपये लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे आनंद नगर, उस्मानाबाद येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक डॉ.राहुल खाडे, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद, श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक यांनी केली असुन सदर कारवाईस पोह/शेख, पोना/जाधव, मारकड, पोकॉ/बेळे, डोके, आचार्य यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दुरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **मोबाईल ॲपद्वारे www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

**1)** मा.डॉ.राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8888807299

**2)** श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9527943100

**3) टोल फ्री क्र. 1064,** दूरध्वनी क्र.- 02472-222879

**E-Mail ID:-** dysposmanabad@gmail.com

(प्रशांत संपते)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन, ब्युरो, उस्मानाबाद

Scanned with CamScanner